१५/८/२०१० दै. सकाळ

## संक्षिप्त



कोल्हापूर : प्राचार्य डॉ. ए. बी. राजगे यांचा सत्कार करताना विद्यापीठ प्राचार्य असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील. शेजारी सी. आर. गोडसे, बी. एन. पवार, डॉ. डी. आर. मोरे आदी.

### संचालकपदी निवडीबद्दल डॉ. ए. बी. राजगे यांचा सत्कार

कोल्हापूर, ता. १४ : शिवाजी विद्यापीठाच्या महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाच्या संचालकपदी प्राचार्य डॉ. ए. बी. राजगे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा शिवाजी विद्यापीठ प्राचार्य असोसिएशनतर्फे सत्कार करण्यात आला. प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांच्या हस्ते सत्कार झाला. यावेळी प्राचार्य टी. एस. मगदूम, प्राचार्य टी. एस. पाटील, प्राचार्य बी. एन. पवार, प्राचार्य ए. सी. कासार, प्राचार्य अशोक बाबर, प्राचार्य एस. बी. भांबुर्डेकर, प्राचार्य जे. एस. पाटील, प्राचार्य सी. आर. गोडसे उपस्थित होते. प्राचार्य डी. आर. मोरे यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्य दिनकर पाटील यांनी आभार मानले.

२८/२/१० दै. लोकमत

## कमला महाविद्यालयात फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम उत्साहात

**कोल्हापूर, दि. २७ :** कमला महाविद्यालय आणि स्टेप इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने प्राध्यापकांसाठी 'फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम ऑन आय.सी.टी. स्किल्स अपग्रेडेशन'चे आयोजन करण्यात आले. प्राध्यापकांना अध्यापनाची नवनवीन कौशल्ये आणि पद्धती यांची माहिती करून देणे, अध्यापन प्रक्रिया अधिक विद्यार्थीभिमुख बनविणे, संगणकीय कौशल्याचा वापर वाढवणे, संघभावना वाढविणे या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. प्राचार्य म्हणाले, उच्च शिक्षणाची गुणवत्ता ठरविणारा एक महत्त्वाचा घटक म्हणजे अध्ययन-अध्यापन प्रक्रिया होय. 'नॅक'नेदेखील मूल्यांकन प्रक्रियेत या घटकांवर जास्त भर दिला आहे. त्यामुळे ही प्रक्रिया अधिकाधिक प्रभावी आणि विद्यार्थीकेंद्रित करण्यासाठी प्राध्यापकांनी प्रयत्नशील राहिले पाहिजे. केवळ लेक्चर पद्धतीचा वापर न करता विद्यार्थ्यांमध्ये विषयाची गोडी निर्माण केली पाहिजे.

तज्ज्ञ मार्गदर्शक कर्नल विक्रम पाटील व कर्नल सूर्यकांत इंगळे यांनी काम पाहिले. इंगळे यांनी लेसन प्लॅन कसा तयार करावा? ज्ञानाचे व्यवस्थापन कसे करावे? स्वत:ची बलस्थाने व दुर्बलस्थान कशी ओळखावीत, विधायक टीका कशी करावी? यांविषयी माहिती दिली. प्रा. डॉ. सौ. वर्षा मैंदर्गी यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. प्रा. नीता धुमाळ यांनी सूत्रसंचालन, तर प्रा. राधिका प्रधान यांनी आभार मानले. यावेळी प्रा. डॉ. जे. बी. पाटील, प्रा. ए. एम. साळोखे, प्रा. एस. एन. कोळेकर आदी उपस्थित होते.

शैक्ष

## 'ज्ञान सप्रमाण आत्मसात केल्यास प्रत्येकाला बुध्द होता येते'

▶ कोल्हापूर / प्रतिनिधी

स्वत:च्या क्षमता ओळखून ज्ञान प्राप्त करण्यासाठी भाषेचा योग्य वापर करून जीवन जगल्यास प्रत्येकाला बुध्द होता येते असे ज्येष्ठ विचारवंत डॉ. आ. ह. साळुंखे यांनी सांगितले.

ते तथागत बुध्द एक आकलन या विषयावरील व्याख्यानात बोलत होते. कमला कॉलेज येथे कै.डॉ व्ही.टी.पाटील यांच्या १३व्या पुण्यतिथीनिमित्त व्याख्यानाचे आयोजन केले होते.

ते म्हणाले की, योग्य ध्येय निश्चित करून प्रयत्न केल्यामुळे ज्ञान प्राप्त होते. माणूस मागे राहतो याचे कारण त्याला स्वत:च्या क्षमतांचे योग्य आकलन झालेले नसते. क्षमता ओळखून योग्य प्रकारे व्यक्तिमत्व घडवता आले पाहिजे असे सांगून कोणतीही गोष्ट कोणीतरी सांगतंय म्हणून योग्य मानण्यापेक्षा स्वत:ला ती हिताची आहे असे वाटले तरच त्याचा स्वीकार करा.

भाषेविषयी बोलताना त्यांनी सांगितले की, आजपर्यंत झालेली युध्दे तलवारीपेक्षा जीभेनेच अधिक केली आहेत तेव्हा अन्यायाला जरूर विरोध करा पण जीभ सांभाळून वापरा. बुध्दांनी अडीच हजारवर्षापूर्वी स्त्रीयांविषयी आखलेले धोरण आजही अनुकरणीय आहे. त्याचा पुरस्कार प्रत्येकाने केला पाहिजे.

कै.डॉ व्ही.टी.पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरूवात झाली. पाहुण्यांचे स्वागत रामराव बेनाडीकर यांनी तर आभार जयसिंग सावंत यांनी मानले. प्राचार्य क्रांतीकुमार पाटील यांनी प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय करून दिला.




**कोल्हापूर:** कमला कॉलेज येथे आयोजित व्याख्यानात बोलताना डॉ. आ.ह. साळुंखे, सोबत प्राचार्य क्रांतीकुमार पाटील, रामराव बेनाडीकर, रा.कृ. कणबरकर आदि.